## निशाणी ४३ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला याने दाखल केला असून त्यात त्याने अर्जदाराने दाखल केलेला मुख्य अर्ज रद्द करुन त्यातील पोटगी फौजदारी चौकशी अर्ज ११३/ २०१८ मध्ये वर्ग करावी अशी मागणी त्यांनी केली आहे. अर्जदार याने निशाणी ४४ कडे म्हणणे सादर करुन या अर्जास सक्त हरकत नोंदवली.

२. सामनेवाला याचे अर्जातील कथन की, अर्जदार हिने सामनेवालाविरुध्द फौजदारी चौकशी अर्ज क्र ११२/२०१८ हा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण या अधिनियमाखाली दाखल केला असून फौजदारी चौकशी अर्ज क्र ११३/२०१८ हा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ प्रमाणे दाखल केला आहे. या दोन्ही अर्जातील अर्ज दाखल करण्याची कारणे, आरोप आणि अर्ज दाखल करण्यास घडलेले कारण ही सारखीच आहेत. त्याप्रमाणे अर्जदाराला रक्कम रु. ३,०००/— व रक्कम रु. ५,०००/— पोटगी म्हणून देण्याचे आदेश अर्जदाराच्या लाभात झाले आहेत. अर्जदार हिने समान अर्ज दाखल करण्याची कारणे, आरोप आणि अर्ज दाखल करण्यास घडलेले कारण यावर आधारित अर्ज करुन मा. न्यायालयाकडून पोटगी मिळवलेली आहे. अर्जदार ही समान अर्ज दाखल करण्याची कारणे, आरोप आणि अर्ज दाखल करण्यास घडलेले कारण असताना दोन विभक्त अर्ज दाखल करुन पोटगी मिळवू शकत नाही. अर्जदार हिने मा.न्यायालयाची दिशाभूल केली असल्याने फौजदारी चौकशी अर्ज क्र ११२/२०१८ मधील दरमहा रक्कम रु. ३,०००/— प्रमाणे दयावयाची पोटगीची रक्कम थांबविण्यात यावी तसेच आत्तापर्यंत सामनेवाला याने अदा केलेली रक्कम

अर्जदाराकडून वसूल करुन सामनेवाला यास देण्याची मागणी सामनेवाला याने केली. तसेच मूळ फौजदारी चौकशी अर्ज क्र ११२/२०१८ हा रद्द करण्याची व त्यातील पोटगीची रक्कम फौजदारी चौकशी अर्ज क्र ११३/२०१८ मध्ये वर्ग करण्याची विनंती सामनेवाला याने केली.

३. अर्जदार हिने निशाणी ४४ कडे म्हणणे सादर केले. त्यात त्यांचे कथन की, सदरचा अर्ज दाखल करुन सामनेवाला मा. न्यायालयाची दिशाभूल करु पाहत आहे. कायदयातील तरतुदी या स्पष्ट असून अर्जदाराने एक अर्ज दाखल केल्यास इतर अर्ज दाखल करु नये याबाबत कोणत्याही कायदयाची बाधा नाही. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे रक्षण अधिनियम तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ प्रमाणे दाखल अर्जावर आदेश पारीत करतांना मा. न्यायालयाने सामनेवाला याच्या उत्पन्नाच्या साधनांचा उहापोह आदेशात केलेला आहे. म्हणून सदरच्या आदेशात असंदिग्धता नाही. म्हणून सामनेवाला याने दाखल केलेला अर्ज हा कायदेशीर तरतुदींना धरुन असल्याने तो खर्चासह नामंजूर करण्याची विनंती अर्जदाराने केली.

४. दोन्ही बाजूकडील सन्माननीय विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. सामनेवालातर्फे विधिज्ञ श्री. संजय घरत यांनी युक्तीवाद केला की, सामनेवाला हा फौजदारी चौकशी अर्ज ११२/२०१८ मध्ये दरमहा रक्कम रु. ५,०००/— इतकी पोटगी अदा करत असून फौजदारी चौकशी अर्ज क्र ११३/२०१८ मध्ये रक्कम रु. ३,०००/— इतकी पोटगी अदा करत आहे. समान अर्ज दाखल करण्याची कारणे, आरोप आणि अर्ज दाखल करण्यास घडलेले कारण यावर आधारित दोन विभक्त चौकशी अर्ज दोन विभक्त कायदयानुसार अर्जदार हिने दाखल केली असल्याने त्यापैकी एक अर्ज रद्द करुन त्यातील पोटगी दुस—या अर्जात वर्ग करणे न्यायोचित होईल. सामनेवाला अदा करत असलेली पोटगी ही

डबल होत असल्याने कमी रकमेच्या पोटगीचा अर्ज रद्द करुन त्यात अदा केलेली पोटगीची रक्कम जास्त रकमेच्या पोटगीच्या अर्जात वर्ग करणे न्यायोचित होईल. सामनेवालाविरुध्द पारीत करण्यात आलेले दोन्ही आदेश सामनेवालावर अन्यायकारक असल्याने त्या पैकी एक आदेश रद्द करण्यात यावा. या युक्तीवादाच्या पुठयर्थ सामनेवाला याने खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतला.

**१. एस. सुप्रिया देवी वि. थिलीप कुमार/मद्रास हायकोर्ट/जून २०१८.**

सामनेवाला यांचे विधिज्ञ यांचे सांगण्यानुसार या न्यायनिर्णयात नमूद करण्यात आले आहे की, कौटुंबिक हिंसाचार कायदयाअंतर्गत कलम २० (३) अन्वये पोटगी देण्याचा आदेश दिलेला असताना त्यातील तथ्यांच्या आधारे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये पोटगी देता येणार नाही.

**२. बी. प्रकाश वि. दिपा व इतर/मद्रास हायकोर्ट/जुलै २०१५.**

सामनेवाला यांचे विधिज्ञ यांचे सांगण्यानुसार या न्यायनिर्णयात नमूद करण्यात आले आहे की, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अंतर्गत सारख्याच तथ्यांच्या आधारे दोन वेगवेगळया न्यायालयात दोन प्रकरणे दाखल करणे न्यायोचित नाही. त्या पैकी एक प्रकरण बंद करणे आवश्यक आहे.

**३. विशाल गोरे वि. अपर्णा व्ही. गोरे/बॉम्बे हायकोर्ट/२०१८.**

सामनेवाला यांचे विधिज्ञ यांचे सांगण्यानुसार या न्यायनिर्णयात नमूद करण्यात आले आहे की, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अंतर्गत कौटुंबिक वादातील प्रकरणांमध्ये देण्यात आलेली पोटगी ही कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अंतर्गत पोटगी देताना ती अतिरिक्त ठरता कामा नये.

**४. सुदिप चौधरी वि. राधा चौधरी/सुप्रिम कोर्ट ऑफ इंडिया/जानेवारी १९९७**

सामनेवाला यांचे विधिज्ञ यांचे सांगण्यानुसार या न्यायनिर्णयात नमूद करण्यात आले आहे की, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ नुसार देण्यात आलेली पोटगीची अतिरिक्त रक्कम ही कौटुंबिक वादातील इतर प्रकरणांत वर्ग होणे न्यायोचित आहे.

**५. शैलेंद्र नाथ घोष वि. स्टेट ऑफ वेस्ट बेंगाल/१९९८ (१)एएलटी की १७**

सामनेवाला यांचे विधिज्ञ यांचे सांगण्यानुसार या न्यायनिर्णयात नमूद करण्यात आले आहे की, हिंदू विवाह कायदा कलम २४ अंतर्गत अदा केलेली पोटगीची रक्कम फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अंतर्गत दाखल खटल्यात वर्ग करता येउ शकते.

**६. संजय निरांजने वि. स्वाती निरांजने/बॉम्बे हायकोर्ट/२००५**

सामनेवाला यांचे विधिज्ञ यांचे सांगण्यानुसार या न्यायनिर्णयात नमूद करण्यात आले आहे की, हिंदू विवाह कायदा कलम २४ अंतर्गत पोटगीची रक्कम देण्याचा आदेश अस्तित्वात असल्यास फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अंतर्गत दाखल खटल्यातील पोटगीची रक्कम त्या प्रकरणात ॲडजस्ट करणे आवश्यक आहे.

**७. रचना काथुरिया वि. रमेश काठुरिया/दिल्ली हायकोर्ट/२०१०**

सामनेवाला यांचे विधिज्ञ यांचे सांगण्यानुसार या न्यायनिर्णयात नमूद करण्यात आले आहे की, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अंतर्गत पोटगीची रक्कम अदा करण्याचे आदेश असताना कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम अंतर्गत पोटगीची रक्कम मागण्याचा हक्क महिलेला

नाही.

**८. कोल्ला विरा राघव राव वि. गोरांटला व्ही राव/ सुप्रिम कोर्ट ऑफ इंडिया/फेब्रुवारी/२०११**

सामनेवाला यांचे विधिज्ञ यांचे सांगण्यानुसार या न्यायनिर्णयात नमूद करण्यात आले आहे की, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३००(१) तसेच भारतीय संविधान आर्टिकल २० २ नुसार एक व्यक्तीला एकाच गुन्यासाठी दोन वेळा शिक्षा देणे न्यायोचित नाही.

५. अर्जदारातर्फे ॲड. एस टी वाडेकर यांनी युक्तीवाद केला की, फौजदारी चौकशी अर्ज ११२/२०१८ हा अर्जदारासाठी असून अर्जदार व सामनेवाला यांच्या मुलांसाठी नाही. याउलट फौजदारी चौकशी अर्ज ११३/२०१८ हा अर्जदार व मुलांसाठी आहे. या दोन्ही अर्जातील अर्जदार हे वेगवेगळे आहेत. सदरचे दोन्ही अर्ज एकाच दिवशी दाखल असून त्यातील कथने वेगवेगळी आहेत. पत्नी व मुलांचे पालनपोषण करण्याची जबाबदारी ही सामनेवाला याने एकाच वेळी नाकारलेली आहे. या दोन्ही मुख्य अर्जातील अंतरिम पोटगी मिळण्याच्या अर्जावर म्हणणे दाखल करताना सामनेवाला याने अशी कोणतीही हरकत उपस्थित केली नव्हती. सदरचे अंतरिम आदेश पारीत होउन देखील सामनेवाला हा अर्जदारास नियमित पोटगी अदा करीत नाही. दि. १३.११.२०१८ रोजी या दोन्ही मुख्य अर्जात अंतरिम पोटगीचा आदेश पारीत करण्यात आला असून फौजदारी चौकशी अर्ज क्र ११२/२०१८ मध्ये सामनेवाला याने अर्जदारास दरमहा रक्कम रु. ३,०००/— इतकी पोटगी देण्याचे आदेश झाले असून फौजदारी चौकशी अर्ज ११३/२०१८ मध्ये सामनेवाला याने अर्जदार क्र १ दिपाली घरत हिस दरमहा रक्कम रु. २,०००/— तर अर्जदार क्र २ सुरज घरत व अर्जदार क्र ३ भार्गवी घरत यांना प्रत्येकी रक्कम रु.

१,५००/— इतकी पोटगी देण्याचे आदेश पारीत करण्यात आलेले आहेत. सदरचे दोन्ही आदेश कायदयाप्रमाणे पारीत करण्यात आले असल्याने तसेच सदरचे दोन्ही अर्ज कायदेशीर असल्याने कोणताही अर्ज रद्द करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे सामनेवाला याचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा. सामनेवालातर्फे दाखल न्यायनिर्णय हे या खटल्यास लागू होत नाहीत.

६. अर्ज, म्हणणे, युक्तीवाद तसेच अभिलेखावरील न्यायनिर्णय विचारात घेतले. अर्जदार दिपाली घरत हिने फौजदारी चौकशी अर्ज क्र ११२/२०१८ हा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम प्रमाणे दाखल केला असून फौजदारी चौकशी अर्ज क्र ११३/२०१८ हा अर्जदार क्र १ दिपाली घरत, क्र २ सुरज घरत व अर्जदार क्र ३ भार्गवी घरत यांनी दाखल केला आहे. हे दोन्ही अर्ज समान अर्ज दाखल करण्याची कारणे, आरोप आणि अर्ज दाखल करण्यास घडलेले कारण यावर आधारित राहून दाखल केले असल्याचे सामनेवालाचे म्हणणे आहे. सामनेवाला तसेच अर्जदार क्र १ दिपाली घरत, क्र २ सुरज घरत व अर्जदार क्र ३ भार्गवी घरत ही एकाच कुटुंबातील सदस्य आहेत. सामनेवाला याचेवर आरोप असलेल्या अर्जातील घटना या याच कुटुंबात घडल्या असून त्या कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम प्रमाणे दाखल केलेल्या अर्जात वेगळया तर फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ प्रमाणे दाखल अर्जात वेगळया असण्याचे कोणतेही कारण नाही. अन्यायग्रस्त महिला तसेच बालकांनी केवळ एकच कायदयाप्रमाणे लाभ मागावेत व इतर कायदयांप्रमाणे मागू नयेत अशी कोणतीही कायदयाची बाधा कायदयात नमूद केलेली नाही.

७. सामनेवालातर्फे दाखल न्यायनिर्णय हे एकाच तथ्यांवर दोन

वेगवेगळया न्यायालयात किंवा दोन वेगवेगळया कायदयांअंतर्गत पोटगीचा आदेश करण्यात येउ नये याबाबत आहे. प्रस्तुत प्रकरणात फौजदारी चौकशी अर्ज ११२/२०१८ व फौजदारी चौकशी अर्ज क्र ११३/२०१८ ही प्रकरणे एकाच तथ्यांवर आधारित असली तरी या दोन्ही प्रकरणांत अंतरिम पोटगीचा आदेश एकाच दिवशी म्हणजे दि. १३.११.२०१८ रोजी पारीत करण्यात आलेला आहे. प्रत्येक प्रकरणांत पोटगीची रक्कम निश्चित करतांना दुस—या प्रकरणांतील पोटगीची रक्कम विचारात घेतली आहे.

८. त्याचप्रमाणे फौजदारी चौकशी अर्ज ११२/२०१८ व फौजदारी चौकशी अर्ज क्र ११३/२०१८ मधील अंतरिम अर्जावर एकाच दिवशी युक्तीवाद करण्यात आला आहे. त्या वेळी अशी कोणतीही हरकत सामनेवाला याने उपस्थित केली नव्हती. दोन्ही बाजूंकडील युक्तीवाद ऐकून दि. १३.११.२०१८ या एकाच दिवशी अंतरिम अर्जांवर आदेश पारीत करण्यात आले आहेत. एका मुख्य अर्जातील अंतरिम अर्जावर आदेश पारीत करतांना दुस—या मुख्य अर्जातील अंतरिम अर्जाचा विचार करण्यात आलेला असून सदरच्या दोन्ही अंतरिम अर्जांवर योग्य तो आदेश पारीत करण्यात आला आहे. त्यामुळे सदरचा आदेश सामनेवाला याच्यावर अन्यायकारक असल्याचे दिसून येत नाही. म्हणून या सर्व कारणांकरिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे —

## आदेश

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. आदेशाची प्रत अर्जदार व सामनेवाला यांना मोफत देण्यात यावी.

Digitally signed by Vishal Shravan Dhondage
Date: 2020.01.08 16:07:30 +0530

दि. ०८.०१.२०२० (विशाल श्रावण धोंडगे)
खालापूर न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग खालापूर